# युरोप २०१९

## स्वित्झर्लंड (स्टेन्सस्टेड)

सकाळी लवकर उठून आटपून शिवाय सँडविचेस बरोबर घेऊन मोनिकाचं ते सुंदर घर सोडलं. समोरच स्टेशनवर आलो. इथे एक गम्मत आहे गाडीची पण. जर तुम्हाला तिकिटावर २ब असा बोगी नंबर दिला असेल तर तिथेच उभे राहावं लागत. बाजूला गर्दी नाही म्हणून २ड मधे चढलात तर दुसरीकडे पोचू शकता. म्हणजे असे की तिथे गाडीच्या २ बोगी एके ठिकाणी आणि उरलेल्या २ बोगी दुसरीकडे पण जाणाऱ्या असू शकतात. आम्ही पुन्हा इंटरलाकेन जंकशनला आलो आणि तिथून 'लुसर्न' या स्वित्झर्लंडच्या प्रसिद्ध शहराला जाणारी गाडी पकडली. गाडीचा आरामदायी प्रवास आणि खिडकीबाहेरची मनमोहक दृश्य ह्याने मन आणि डोळे प्रसन्न झाले अगदी. हा प्रवास खूपच मजेशीर झाला. एकतर सगळ्या सुखसोयींनीयुक्त अशी ट्रेन आणि भरपूर गप्पा मारायला मिळालेला वेळ. आजूबाजूला तसे फारसे कोणी नव्हते. एक मुलगी होती जिने स्वतःहूनच आम्हाला फोटो काढून देऊ का विचारले आणि आम्हीही लगेच हो म्हणून तिचा मान राखला. नंतर ती वाचनात आणि खाण्यात मग्न झाली. प्रवास २ तासाचा होता. लुसर्न शहराबद्दल बरच ऐकून होतो. थोड्यावेळाने एक तलाव दिसू लागला, त्यातला हिरवं-निळं पाणी आणि बाजूची हिरवीगार शेत मधेच डोकावणारे डोंगर, रस्ते आणि घर यामुळे आम्ही पुन्हा एकदा स्वित्झर्लंडच्या प्रेमात पडलो. स्वर्गात तर पोचलो नाही ना अशी शंका यायला लागली.



लुसर्न हे स्वित्झर्लंडचे लोकप्रिय ठिकाण. बऱ्याच जणांनी आम्हाला येथेच राहा असे सांगितले होते. परंतु आम्ही इथून जवळच म्हणजे १५ मिनिटाच्या अंतरावर असलेल्या उपनगर वाटेल

अशा ‘स्टेन्सस्टेड’ इथे राहणार होतो. लुसर्न स्टेशनवर उतरल्यावर त्याची भव्यता लक्षात आली. राजधानी ‘बर्न’ पेक्षा ही ह्याचा तोरा अधिक वाटत होता. बर्न बघायची इच्छा इथून पूर्ण करणार होतो. लुसर्न स्टेशनवर ही विनासायास सर्व गाड्यांची माहिती, त्यांच्या वेळा, किती वेळाने आहेत असे सगळेच वाचून नोंद करून घेतले, तिथून आम्ही एन्गेलबेर्गला जाणारी ट्रेन पकडली. ह्यात चढलो आणि लक्षात आले गाडीत फारसे कोणीच नव्हते. त्यामुळे अजूनच राजेशाही वाटू लागले. तेवढ्यात पुढल्या स्टेशनवर तिकीट तपासनीस चढला. पांढऱ्याशुभ्र कपड्यात राजबिंडा, हसमुख असा तपासनीस बघून आपल्याकडे वाटते तशी भीती वाटण्याऐवजी त्याच्याशी बोलावं वाटू लागलं. आमचा स्विसपास स्कॅन करून त्याने विचारले, ‘भारतीय? आमचा सुंदर देश बघायला आलात?’ आम्ही हसून हो सांगितलं, तशी म्हणाला, ‘सध्या हवा खूप छान आहे, काही दिवसांपूर्वी इथे तापमान खूपच वाढलं होतं. पण आता नाही, तेव्हा तुम्हाला खूप फिरत येईल आणि खूप मजा घेता येईल.’ आम्ही त्यालाच माऊंट टिटलिस बद्दल विचारू लागलो तशी म्हणाला, ‘आमच्या देशात अशी खूप आश्चर्यकारक प्रेक्षणीय स्थळं आहेत. तुम्ही ती जरूर बघा. सांगून मला त्यातली मजा घालवायची नाही. बघाल तिकडे तुमच्यासाठी निसर्गाने खजिना उघडून ठेवलाय, तुमचे डोळे थकतील पण तुमच्यासमोरची निसर्ग दृश्यं तुम्हाला हरखून जायला लावतील.’ हसून शुभेच्छा देऊन तो उतरून गेला. आम्ही स्टेन्सस्टेन्डला उतरलो. कुठल्या बाजूला बाहेर पडायचे हे लक्षात येईना. मग सगळे एके ठिकाणी उभे राहून विनायक दोन्ही बाजूला बाहेर जाऊन बघून आला. तिकडच्या नावावरून काहीच कळत नव्हतं. शेवटी आम्हा सगळ्यांना ज्या बाजूला जावे असे वाटत होते तिकडे गेलो. तिथे जड बॅगा न्यायला जिन्याच्या बाजूला एक चढ केला होता. छोट्या छोट्या सोयी बघून खरंच आश्चर्यचकित व्हायला होत होतं. वरती आल्यावर पत्ता शोधत चालतच आम्ही आमच्या नवीन घरी पोचलो. हे थोडं शहरातील घर होतं. आजूबाजूच्या रस्त्यावर अगदी शांतता होती. गाड्यांची वर्दळ पण तुरळक ! इथे आमच्या घराचा मालक होता 'रेनी'. त्याने सगळ्या जवळच्या खाणाखुणा, जवळचे सुपर मार्केट अशी माहिती दिली होती. दुमजली घरात आम्ही पहिल्या मजल्यावर आणि तो दुसऱ्या मजल्यावर अशी सोय होती. अर्थात इथे मुद्दाम ओळख काढून भेटणे वैगरे दुर्मिळच. त्यामुळे त्याने दिलेले कोडनंबर्स वापरून आम्ही ८/१० पायऱ्या चढून घर उघडलं. आत शिरताच छोटेखानी हॉल, बाजूला पॅसेजमध्ये बाथरूम आणि एकापुढे एक अशा २ बेडरूम्स आणि सर्वात शेवटी मिनी म्हणता येईल असं किचन. पण तेही सर्व सोयीयुक्त. फ्रिजवर एका स्टिकपॅडवर आमच्या स्वागतासाठी मेसेज आणि त्यावरचा तिथल्या वाय-फायचा पासवर्ड लिहिलेला बघून आम्ही खुश झालो. बाजूलाच एका मोठया काळ्या फळ्यावर अगोदरच्या राहून गेलेल्या लोकांच्या प्रतिक्रिया वाचायला मजा अली. सगळ्यांनीच 'रेनी'च कौतुक केलं होतं. आम्ही पुन्हा एकदा घर बघू लागलो आणि लक्षात आल, रेनीने घर फारच विचारपूर्वक सजवलं होतं. अर्थपूर्ण अशा चित्रांच्या फ्रेम्स, सुविचार, कलात्मक वस्तू यामुळे त्या घरात एकदम

उत्साही वाटू लागलं. सर्वात आवडलेली गोष्ट म्हणजे किचन दरवाजातून बाहेर एक भलीमोठी गॅलरी जिचा एक दरवाजा हॉलमध्ये. ही घराची फारच आकर्षक गोष्ट होती.

आम्ही नेहमीप्रमाणे बरोबर असलेल्या इन्स्टंट वस्तूंमधून डाळ-खिचडी केली, त्याबरोबर बटाटा वेफर्स, लोणचं होतच. त्या दिवशी हवा खूप छान वाटत होती म्हणून आम्ही माऊंट टिटलिसला जायचं ठरवलं. दुपारचे ३ वाजले होते आणि दिवस ९ पर्यंत मावळणार नव्हता. त्यामुळे लगेच निघालो. स्टेशनवर आलो आणि एन्गेलबेर्गला जाणारी गाडी पकडली. पुढच्या स्टेशनवर तिकीट तपासनीस चढला. त्याने आमच्याकडे बघितले आणि आम्ही त्याच्याकडे, सगळेच जण आधीची ओळख असल्याप्रमाणे जोरात हसू लागलो. तो पण खुशीत येऊन म्हणाला, 'आता मी तुमचे स्विस पास चेक नाही करणार कारण ते तुमच्या मोबाईलमधेच आहेत आणि मोबाईल तुमच्या खिशात'. मगाशी गप्पा मारणारा उत्तम व्यक्तिमत्त्वाचा आणि उत्साही तिकीट तपासनीस पुन्हा आम्हाला भेटला होता. पुन्हा एकदा शुभेच्छा देऊन तो पुढे गेला.

आम्ही एन्गेलबेर्गला उतरलो आणि माऊंट टिटलिससाठी त्या गावातून चालत निघालो. पुढे केबलकारसाठी थांबलो. इथे केबल-कारचे २ टप्पे होते. पहिल्या टप्प्यात केबल-कार छोटी होती आणि वेगात पुढे जाणारी होती. प्रत्येक कार वर एकेका देशाचा झेंडा चित्रित केला होता. आम्हाला त्यात भारताचाही झेंडा दिसला. ऊन पडले असल्याने आजूबाजूला निसर्गाची विविध रूप बघत, मधेच स्वित्झर्लंड गायींच्या गळ्यातल्या घंटेच्या आवाजाचं पार्श्व-संगीत ऐकत वरती निघालो. पुढल्या टप्प्यावर गेल्यावर हवा एकदम बदलली होती. ढगाळ हवा आणि धुकं यामुळे पुढच्या केबल कार दिसतच नव्हत्या. पुढच्या केबल-कारच वैशिष्ट्य म्हणजे ती ३६० डिग्री मध्ये गोलाकारही फिरते आणि पुढेही जाते. अतिशय उत्कंठापूर्ण वातावरणात आम्ही ह्यात चढलो. थंडी वाजू लागली होतीच. पुढे गेल्यावर सर्व परिसर सर्वांनाच दिसणार होता. मधेमधे ऊन पडलं कि केबल कारमध्ये असलेल्यांचे आनंदी चित्कार येऊ लागत. सगळेच जण त्या अनुपम सौन्दर्याने भारून गेले होते. तरी धुक्यामुळे बरेच दिसू शकले नाही. वरती पोचलो. तिथली ३ मजली इमारत सगळ्या अद्ययावत गोष्टींनी सुसज्ज होती ते बघून पण थक्क व्हायला झाले. बाहेर बर्फाच्या डोंगरावर आलो एकदाचे. पुढ्यात काजोल आणि शाहरुख खान बघून डोक्यालाच हात मारला. भारतीय लोकांच्या आवडीच्या ठिकाणी त्यांचे आवडीचे कलाकार उभे होते स्वागताला!! पुढे बर्फात खेळायला गेलो. हवा मधेच ढगाळ होतं होती. आम्ही खूप फोटो आणि बर्फात खेळून घेतलं. तेवढ्यात पावसाला सुरवात झाली. मग हळूहळू परत निघालो. माऊंट टिटलिस च्या पायथ्याच्या हॉटेलातील वडापाव आणि मसाला चहा घेतला तेव्हा पावसाने जोर धरला होता. आम्ही बसने मधेच उतरून येता येता पावसाच्या रिपरिप सरीत भिजत विंडो-शॉपिंग आणि सुपरमार्केट मधून दुसऱ्या दिवशीसाठी ब्रेड, बटर, ज्युस विकत घेऊन घरी आलो.

आम्ही बाहेरून घराचे फोटो काढायचा विचार करत असतानाच एक काळी गाडी छान वळणदार वळण घेत आमच्याच पार्किंगमध्ये येऊन उभी राहिली. आतून गोरटेला, शिडशिडीत, हसतमुख माणूस उतरला. आमच्या समोर येऊन विनायक? अशा खास शैलीत बोलून हस्तांदोलनासाठी हात ही पुढे केला. विनायकने हसून हात हातात घेतला. हा आमचा मालक 'रेनी' होता. त्याने, 'घर आवडले का? काही गैरसोयी आहेत का?' असे आवर्जून विचारले. आम्ही त्याला घर अतिशय आवडले आणि पुन्हा आलो की इकडेच राहायला येऊ असेही सांगितले. तो खूपच खुश झाला. तो व्यवसायाने पायलट असावा. हातातली बॅग सांभाळत तो निघू लागला तशी आमच्या फोटोच्या विनवणीला मान देऊन थांबला. पुन्हा एकदा शुभेच्छा देऊन तो घरी गेला. आम्ही घराच्या बाहेरचे फोटो काढत, परिसर न्याहाळत थोड्या वेळाने घरात शिरलो. उबदार घरात, मंद प्रकाशात रात्रीचे जेवण करून गप्पा मारत बसलो. दुसऱ्या दिवशी लुसर्न शहर बघूया असे ठरवले आणि लगेच झोपी गेलो.

सकाळी नेहमीप्रमाणे नाश्ता करून लुसर्नला निघालो. आता इथेही आम्ही सराईतपणे गाडी पकडायला लागलो होतो. कुठून कसे जायचे ह्याबद्दल कसल्याही शंका न येता आम्ही निर्धास्तपणे प्रवास करू लागलो. लुसर्न स्टेशनला उतरून बाहेर आलो आणि बससाठी वाट बघू लागलो. स्टेशनबाहेर मोठा तलाव बघून ठरवूनच टाकले की ह्या तलावात फिरून यायचंच. आम्ही निघालो होतो जगप्रसिद्ध 'ट्रान्सपोर्ट म्युझिअम' बघायला. बाहेरूनच म्युझिअमची भव्यता जाणवू लागली. तिकीट काढून आत शिरलो आणि अक्षरशः डोळे विस्फारून बघू लागलो. रेल्वे, बोट्स, चारचाकी गाड्या, विमाने सगळ्याबद्दलची एवढी विस्तृत माहिती आणि ती देखील मनोरंजक पद्धतीने मांडली होती की लहान मुलांच्या बरोबरीने मोठी मंडळी ही गुंग होऊन गेली होती. कोणाला ट्रेन चालवायची होती तर कोणी शिडाच्या बोटीला नियंत्रित करत होते. हे बघून म्युझिअम कसे असावे ह्याचा वस्तुपाठच दिसत होता. इथे सगळी माहिती तुमच्या समोरच्या बटणात साठवलेली होती जणू. तुम्ही ते बटन दाबायची खोटी. इथे एक कार-थिएटर होतं. ज्यात जवळजवळ ५० गाड्या उभ्या होत्या. तुम्हाला ज्या गाडीची माहिती पाहिजे त्याच चित्र आलं की बटन दाबायचे, की थोड्याच वेळात एका लिफ्टने ती गाडी तुमच्यासमोर हजर. त्याबद्दलचा सर्व इतिहास बाजूच्या पडद्यावर दिसू लागे. तिथे मुलांनी खूपच गर्दी केली होती आणि बटन दाबायची जणू चढाओढच चालू होती. आम्हीही त्या शोची मजा घेतली. आम्ही तिकडे खूपच वेळ रेंगाळलो. त्यातच तिथे चॉकलेट फॅक्टरी बघून खरेदी करणे प्राप्तच होते. तिथून बाहेर पडेपर्यंत जेवणाची वेळ झालीच होती. मग आम्ही पुन्हा बस पकडून परतीला लागलो स्टेशनच्या. वाटेत थांबून एका गल्लीतल्या इंडियन हॉटेल मध्ये भारतीय जेवणाचा आस्वाद घेतला आणि तिथेच आजूबाजूला 'बाराबकि पॅनोरामा'ला कस जायचं विचारून शोधत शोधत त्या म्युझियमला आलो. परत म्युझियम म्हटल्यावर अतुलने आधीच सांगितले की मी काही अजून पेंटिंग वैगरे

बघायला येत नाही, त्यापेक्षा इथल्या दुकानात स्विस घड्याळ बघतो मस्तपैकी. आम्हीही विचार करू लागलो कि जाऊया की नको? मग जरा साशंक मनानेच आत शिरून माहिती काढली. इथेही तिकीट काढावं लागणार होत. माहितीवरून हे काहीतरी जगावेगळं आहे असं वाटून गेलं आणि अतुल-प्राचीला जरा ओढतच आणलं हे बघायला. हे म्युझियम आहे एका भव्य चित्राचं. १८७१ मधील नागरी युद्धामध्ये 'जनरल बाराबकि' हा फ्रेंच अधिकारी स्वित्झर्लंडला आला. त्याने तिथल्या युद्धजन्य परिस्थितीतले एक सुंदर चित्र चितारले जे आज एक सांस्कृतिक ठेवा बनले आहे. ह्यातल्या काही गोष्टी पेंटिंग आहेत तर काही खऱ्या. त्याबद्दलची सविस्तर माहिती तिथे मिळतेच. ऑडिओ गाईड उपलब्ध आहे त्यामुळे तुमच्या सगळ्या प्रश्नांना उत्तरे मिळतात. काही तिथे पुन्हा थोडी पावसाला सुरवात झाली. आम्ही भिजतच पुढे 'हॉफकीरचे' नावाच्या चर्चला भेट दिली. तिथे थोडा वेळ विश्रांती घेऊन समोर खुणावणाऱ्या तलावाकडे चालू लागलो. 'हॉफकीरचे' नंतर चालतच आम्ही चॅप्पेल पुलावर आलो. १५०-२०० वर्षांपूर्वीचा हा लाकडीपूल बाहेरून छोट्या छोट्या सुंदर फुलांनी सजवला आहे. आजूबाजूला काही माणसे व्हायोलिन, पायपर असे काही वाजवत लोकांचे मनोरंजनही करत होती. पुलावरून चालत दुसऱ्या बाजूला गेलो. १९९३ साली आगीमध्ये यातील १७ व्या शतकातील रंगीत चित्रांचे नुकसान झाले आहे. पलीकडे काठावर हॉटेलमधल्या बाहेरच्या खुर्च्या, खाली पाण्यात शुभ्र बदके, वरती निळ्या आभाळात उडणारी पाखरे, दुरून येणारे संगीताचे स्वर या साऱ्यांनी वातावरणाला उत्सवी आणि उत्साही किनार लावली होती. दमलो होतो तरी थकवा जाणवत नव्हता.



अतिप्रचंड अशा लेकच्या बाजूला वसलेले हे लुसर्न शहर फारच सुंदर आहे. चौकशी करता करता आम्हाला समजले की इथून स्विस पास मध्ये मोफत अशी पाऊण तासाची बोटीची फेरी आहे. मग आम्ही लगेचच ती बोट पकडली. तलावातून शहराचे अजूनच विलोभनीय चित्र दिसत होते.

थंड गार वारा, निळेशार पाणी आणि आजूबाजूला शांत, संथ वातावरण, शरीराचा आणि मनाचा थकवा दूर करायला पुरेसे होते. पुन्हा परत लुसर्न स्टेशनवर आलो आणि तिथल्या सुपर मार्केट मधून संत्र्याचा ज्यूस घेतला. तिथे एका यंत्रात संत्री ठेवली होती. आपण त्याचे बटन दाबून खाली बाटली धरली की त्या संत्रांचा रस येत असे. असा ताजा ताजा ज्यूस पिऊन ताजेतवाने होऊन थोडी खरेदी करून गाडी पकडली. घरी पोचायला ८.३० वाजलेच. दुसऱ्या दिवशी बर्नला जायचे ठरवले.

बर्नला जाण्यासाठी सकाळी सगळं आटपून लुसर्न वरून गाडी पकडली. साधारण सव्वा दोन तास लागले या प्रवासाला. आम्ही तिकडच्या वेळापत्रकात आणि माहितीपत्रकात बघून गाडी बघून ठेवली होती. ११ वाजता आम्ही राजधानीचे शहर बर्नला पोचलो. सगळ्यात आधी तिकडच्या 'ओल्ड टाउनला' भेट द्यायचे ठरवले होते. त्याप्रमाणे स्टेशनवरून ट्राम पकडली आणि स्टॉपवर उतरून चौकशी करत फिरत फिरत ओल्ड टाउनला भटकायला सुरवात केली. या जागेला युनेस्कोने वर्ल्ड हेरिटेज चा दर्जा दिला आहे. २०० वर्षांपासून इकडच्या गल्ल्याबोळ, इमारती, रस्ते हे सर्व जसे आहे तसे जतन करण्याचा स्तुत्य प्रयत्न आहे हा. जुन्या वातावरणाचा अनुभव घेत पुरेसे फिरून झाल्यावर तिथल्या पार्लमेंटहाऊसकडे निघालो. आता ट्राम ऐवजी बसने निघालो. पार्लमेंट हाऊसपाशी आलो पण समोरची सुंदर भव्य इमारत ती तीच आहे ह्यावर विश्वास बसेना. आजूबाजूला कसल्याही सुरक्षारक्षकांच्या भिंती नव्हत्या त्या उलट तिथे आठवडी भाजी बाजार लागला होता. आम्ही शेवटी तिथल्या एका माणसाला विचारले. त्याने हसून याच फूटपाथवरून जा, हीच इमारत आहे असे सांगितले. मग आधी थोडे भाजी बाजारात डोकावलो, ताजी फळे आणि भाज्या बघून घ्यावाश्याच वाटू लागल्या. तसेच चालत पार्लमेंट हाऊसची इमारत बघून जेवायला एका दक्षिण भारतीय हॉटेलमध्ये गेलो. तिथे हिंदी भाषिक दोघे जण डोसे खात होते. त्यांच्याशी थोडे बोलून जेवून आम्ही पुन्हा विंडो शॉपिंग करत स्टेशनवर आलो. बर्न शहर फारच सुव्यवस्थित आहे. बाजूने वाहणाऱ्या आरे नदीने या शहराच्या सौन्दर्यात भर घातली आहे. स्टेशनवर आलो तर एक गाडी लुसर्नसाठी लागली होती जी लगेच निघणार होती परंतु तिला वेळ जास्त लागणार होता. म्हणून विनायकने सहज तिथे ड्राइवरला जाऊन विचारले की असे का? तेव्हा तो म्हणाला की ही गाडी वेगळ्या रस्त्याने जाते जो लांबचा आहे. मग त्यानेच विनायकला सांगितले की तुम्हाला जर जायची घाई नसेल तर तुम्ही या ट्रेनमध्ये बसा कारण हा रस्ता फारच मनोहारी आहे. तुम्हाला स्वित्झर्लंडच्या खूप सुंदर निसर्गदृश्यांची मेजवानी मिळेल. आम्ही लगेचच त्यात शिरलो. खिडकीजवळची जागा पकडली आणि खरंच भरपूर फोटो आणि चलत्चित्रणाचा आनंद घेत लुसर्नला आलो. आता या वेळी ठरवलं होत की काल केली तशी बोट राईड घेऊनच आपल्या गावाला स्टेन्सस्टेडला जायचं. आम्ही आधीच चौकशी केली होती त्याप्रमाणे ४.४५ मिनिटांनी जाणारी एक बोट आमच्या गावाला ५० मिनिटांनी पोचते असं

कळलं होत. म्हणून स्टेशनवरून बाहेर पडून सरळ बोटीकडे मोर्चा वळवला. आम्ही बोटीत शिरलो आणि बोट सुरु झाली. कालच्या बोट राईडने आमचं कोणाचच पोट भरलं नव्हतं. त्यामुळे आता मनसोक्त बोटीच्या वरच्या भागात जाऊन थंडगार वारा अंगावर झेलत दूरवर पसरलेल्या डोंगररांगा, शांत संथ पाणी आणि आजूबाजूची टुमदार घरं निरखत वेळ कसा संपला कळलंच नाही.



आमच्या गावाला तर उतरलो पण आता घरी जायचा रस्ता शोधायला हवा होता. सुदैवाने उजेड असल्याकारणाने तशी चिंता वाटत नव्हती. रस्त्यावर एकही चिटपाखरू नव्हतं. तसेच चालत पुढे आलो आणि एक सुपरमार्केट दिसलं. मग त्यात शिरलो तर तिथे दुकान बंद करायची घाई चालू होती. आम्हाला बघून मालकीणबाईच्या कपाळावर आठ्यांचं जाळ पसरलं. आम्ही तरीही आम्हाला हवं ते घेण्यास सुरवात केली. तशी त्या मालकीणबाईने आम्हाला लवकर आटपा असं चक्क बजावलं. ६ ला दुकानं बंद होतात त्यामुळे सगळे घाईतच खरेदी केले, पुढे निघालो. शेवटी गुगल मॅप लावून चालतच घरी आलो.

एकूण दिवस खूप मजेचा, खूप भटकंतीचा, नवीन नवीन शोधांचा आणि आम्हाला आवडलेल्या देशातला शेवटचा म्हणून थोडा नाराजीचा होता. पुन्हा इथे येऊन काय काय बघायचे हे आताच ठरवायला सुरवात झाली होती. कितीही बघितलं तरी खूप सारं मागे ठेवून जाणार होतो. दुसऱ्या दिवशी इटलीला निघायचं असल्याने पुन्हा एकदा लुसर्नवरून बासेल स्टेशन आणि तिथून ५० नंबरची शटल बस पकडून 'बासेल' विमानतळ गाठायचा होता. पण आता कसं जायचं नक्की माहित झाल्याने तसेच तिथल्या पब्लिक ट्रान्सपोर्टचा सुखद अनुभव गाठीशी आल्याने कसलीच चिंता वाटत नव्हती. काही अपवाद वगळता लोकांचे फारच चांगले अनुभव मिळाले. वरून दिसायला थोडे आढ्यताखोर, कमी बोलणारे वाटले तरी इथली माणसं हसून खेळून बोलणारी, आवश्यक तेवढा संपर्क ठेवणारी तरी भेटल्यावर जरूर चौकशी करणारी आणि मुख्य म्हणजे

कुटुंबाला धरून ठेवणारी वाटली. ट्रेनचे कर्मचारी, सफाई कामगार, दुकानदार, केबल चालक सगळ्यांची मदत करण्याची वृत्ती आवडून गेली. झोपेत पण निसर्ग सौन्दर्याची उधळण चालू झाली. गाढ झोपेच्या आधीन व्हायला हे सगळे पुरेसे होते.





----------------- संध्या रानडे